# घोषणा

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने **अधिव्याख्याता**, **यंत्र** अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतने, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ (जाहिरात क्र. १३/२०१३) या पदासाठी पाठविलेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने आयोगाकडून दि. ६ जुलै,२०१३ रोजी जाहिरात विज्ञापित करण्यात आली होती. सदर विषयाकरीता आयोगाकडून मुलाखतीपर्यंतचा कार्यक्रम पूर्ण झालेला होता. दरम्यान शासनाने सदर पदाकरीता शिफारसी करण्यात येऊ नये असे कळविल्याने सदर पदाचा अंतिम निकाल प्रलंबित ठेवण्यात आला होता. आता शासनाने सदर विषयाच्या मागणीपत्रातील पदसंख्येत बदल करून सुधारीत पदसंख्या आयोगास कळविली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| जाहिरात क्रमांक/ दिनांक | एकूण पदे | अराखीव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३/२०१३<br>६ जुलै, २०१३ | **८३+९ ■** | **३२+१५*+३☑** | **४+२*** | **५+२*+१☑+९■** | **३+२*** | **३+१*** | **३+१*** | **१+१*** | **३+१*** |
| **■ अनुशेषाची पदे, * उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित, ☑ खेळाडूंसाठी आरक्षित** | | | | | | | | | |
| **चालू रिक्त ८३ पदांपैकी ५ पदे अपंग चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू आणि ६ पदे अपंग अंधत्व व क्षीण दृष्टी याकरीता आरक्षित** | | | | | | | | | |

दि.०९/०५/२०१३ रोजी मागणीपत्र सादर करताना मागासवर्गीयांचे आरक्षण ५०% कमाल मर्यादेत ठेवण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली असल्याने आता फक्त पदसंख्येत बदल करण्यात येत असल्याचे शासनाने कळविले असून सुधारित पदसंख्येनुसार शिफारस करण्याचे कळविले आहे.

शासनाने वरीलप्रमाणे कळविल्यानुसार सुधारीत आरक्षण विचारात घेऊन, सदर पदाच्या अंतिम निकालाची कार्यवाही आयोगाकडून लवकरात लवकर करण्यात येईल, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

सं. पां. देशमुख
अवर सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण - मुंबई
दिनांक - १४/०७/२०१६